महाराष्ट्र आदिवासी विकास सेवा गट- अ मधील
विधी अधिकारी संवर्गातील बदलीबाबत ..

# महाराष्ट्र शासन

## आदिवासी विकास विभाग

**शासन आदेश क्रमांकः आस्थाब-२५१७/प्र.क्र.४१२ /का.१५**

मंत्रालय विस्तार, मुंबई- ४०० ०३२

तारीख: २२ फेब्रुवारी २०१८.

**शासन आदेश :-**

महाराष्ट्र शासकीय कर्मचाऱ्यांच्या बदल्यांचे विनियमन व शासकीय कर्तव्ये पार पाडताना होणाऱ्या विलंबास प्रतिबंध अधिनियम, २००५ मधील कलम ४ (४) दोन व नियम ४ (५) मधिल तरतुदींच्या अनुषंगाने बदली करण्यास सक्षम असलेल्या प्राधिका-याच्या मान्यतेने, खालील अधिकारी यांना नावासमोर (स्तंभ क्र.३ मध्ये) दर्शविलेल्या पदावर बदलीने नियुक्ती करण्यात येत आहे.

| अ. क्र. | अधिकाऱ्याचे नाव व सध्या धारण केलेले पद | बदलीनंतर नियुक्तीचे पदनाम | शेरा |
|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ |
| १. | श्री.व्ही.पी. बेंबळगे,<br>विधी अधिकारी, अनुसूचित जमाती प्रमाणपत्र तपासणी समिती, अमरावती | विधी अधिकारी, अनुसूचित जमाती प्रमाणपत्र तपासणी समिती, औरंगाबाद | रिक्त असलेल्या पदावर |

२. बदलीने पदस्थापना देण्यात आलेल्या अधिकारी यांना नविन पदावर रुजू होण्यासाठी सहआयुक्त, अनुसूचित जमाती प्रमाणपत्र तपासणी समिती, अमरावती यांनी तात्काळ कार्यमुक्त करावे.बदलीने पदस्थापना देण्यात आलेल्या अधिकाऱ्यांनी नविन पदस्थापनेच्या ठिकाणी तात्काळ हजर होवून पदभार स्विकारल्याचा अहवाल आयुक्त, आदिवासी संशोधन व प्रशिक्षण संस्था, पुणे यांच्यामार्फत शासनास सादर करावा तसेच त्यांनी अनधिकृतरित्या रजेवर जाऊ नये.

३. सदरहू बदली आदेशानुसार तात्काळ नियुक्तीच्या ठिकाणी हजर न झाल्यास वा कोणत्याही प्रकारचा राजकीय दबाव आणून बदली रद्द करण्याचा प्रयत्न झाल्यास सदर कृती म.ना.से.(वर्तणूक ) नियम १९७९ मधील नियम २३ चे उल्लघंन करणारी असल्याने सदर बाब गैरवर्तणूक समजून संबंधित अधिकाऱ्यांविरुद्ध शिस्तभंगविषयक कारवाई सुरु करण्यात येईल, याची संबंधितांनी नोंद घ्यावी.

४. हे आदेश तात्काळ अंमलात येतील.

सदर शासन आदेश महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेताक २०१८०२२२१६२१२६४३२४ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

Govind Mahadeo Mainkar

Digitally signed by Govind Mahadeo Mainkar
DN: c=IN, o=Government Of Maharashtra, ou=R. D. D., postalCode=400032, st=Maharashtra, 2.5.4.20=1bd72d2fe0ead7cc96c89d7989efeeb507d84e5de5113b7aa9e6c0ce344b1475, cn=Govind Mahadeo Mainkar
Date: 2018.02.22 16:23:05 +05'30'

**( गोविंद माईणकर )**
**अवर सचिव, महाराष्ट्र शासन**

**प्रत,**

१. मा. मंत्री, आदिवासी विकास, मंत्रालय, मुंबई
२. मा. राज्यमंत्री, आदिवासी विकास, मंत्रालय, मुंबई
३. मा प्रधान .सचिव, आदिवासी विकास विभाग, मंत्रालय, मुंबई
४. आयुक्त, आदिवासी विकास, नाशिक
५. आयुक्त, आदिवासी संशोधन व प्रशिक्षण संस्था, पुणे
६. महालेखापाल ( लेखा व अनुज्ञेयता ) महाराष्ट्र राज्य १/२, मुंबई / नागपूर
७. महालेखापाल ( लेखा परीक्षा ) महाराष्ट्र राज्य १/२, मुंबई / नागपूर
८. सर्व अनुसूचित जमाती प्रमाणपत्र तपासणी समित्या.
९. अपर आयुक्त, आदिवासी विकास, ठाणे / नाशिक/ अमरावती / नागपूर
१०. सर्व उपसचिव, आदिवासी विकास विभाग, मंत्रालय, मुंबई.
११. जिल्हा कोषागार अधिकारी, अमरावतीऔरंगाबाद /
१२. संबंधित अधिकारी,
१३. निवड नस्ती (का.१५)